QUICK NEWS

कोरोना रुग्णांना भेटण्यास मुभा द्या

मुंबई. कोरोनाने गेल्या वर्षभरापासून नागरिक त्रस्त आहेत. दुसऱ्या लाटेत कोरोनाचे रुग्ण वाढत असून त्यातील काही अत्यवस्थ आहेत. त्यांना अनेक रुग्णालयात दाखल केले आहे.परंतु त्यांच्या जवळ कुटुंबातील एका व्यक्तीस पीपीई किट घालून भेटण्यास दिल्यास अश्या रुग्णांच्या प्रकृतीत सुधारणा होईल,अशी मागणी सुधार समितीचे अध्यक्ष सदानंद परब यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे. कोरोनाने मुंबईतील हजारो रुग्ण प्राणास मुकले आहेत.पालिका कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत असली तरी रुग्ण संख्या कमी अधिक होतच आहे.आता दुसऱ्या लाटेत रुग्ण वाढले असून त्यांच्यातील अनेक रुग्ण गंभीर आहेत.त्यांना कोविड सेंटर मध्ये तर काहींना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.गंभीर रुग्णांना पीपीई किट घालून भेटण्यास त्यांच्या नातेवाईकांना दिल्यास त्यांची देखभालही होईल आणि त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. त्यामुळे अशी मुभा द्यावी, अशी मागणी सुधार समिती अध्यक्ष परब यांनी पालिका आयुक्त इकबाल सिंग चहल यांच्याकडे केली आहे.

मुंबईकरांची वाहतूक कोंडीतून होणार सुटका

मेट्रो ७, २ 'ए' प्रगतीपथावर

■ ३१ मे रोजी ट्रायल रनची शक्यता ■ उर्वरित कामे डिसेंबर अखेरीस मार्गी लागणार

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईत सध्या घाटकोपर ते वर्सोवा मेट्रो १ धावत असून याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता मुंबईकरांच्या सेवेत मेट्रोच आणखी दोन मार्ग लवकरच येणार आहे. अवघ्या सात ते आठ महिन्यांत मेट्रो २ 'ए' आणि ७ प्रवाशांसाठी धावणार आहे. त्याची ट्रायल रन येत्या ३१ मे रोजी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जर ही ट्रायल रन यशस्वी झाली तर डिसेंबर अखेरीस उर्वरित कामे मार्गी लावून हे दोन मार्ग मुंबईकरांच्या सेवेत दाखल होतील, अशी शक्यता आहे.

दहीसर ते अंधेरी अंधेरी आणि दहिसर ते डी एन नगर असा प्रवास करण्यासाठी आजच्या घडीला मुंबईकरांना मोठी कसरत करावी लागते. लोकल, बेस्टमधील गर्दी, वाहतूककोंडीचा सामना करावा लागतो. पण आता मात्र लवकरच अगदी सात-आठ महिन्यांत मुंबईकरांची या त्रासातून सुटका होणार असून हा प्रवास सुकर आणि गारेगार होणार आहे.

एमएमआरडीएने कोरोनाच्या विपरित परिस्थितीतही लॉकडाऊनमध्ये काम सुरू ठेवले आहे. मेट्रो २ 'ए'वर दहिसर ते कामराज नगर आणि डेपोच्या लूप लाईनपर्यंत ओव्हर हेड वायर (ओएचई) चार्जचे ट्रायल यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. २५ केव्ही क्षमतेच्या विद्युत मार्गावर वीज पुरवठा सुरूळीत आहे. शिवाय मेट्रो ७ वर ओएचई लाईन चार्ज करण्याचे काम सीईआयजीकडून आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर यशस्वीरित्या सुरू केले गेले आहे. याची लांबी सुमारे २० कि.मी. इतकी आहे. केंद्र सरकारच्या मुख्य विद्युत निरीक्षकांनी (सीईआयजी) मेट्रो लाईन २ 'ए'च्या ओव्हर हेड इक्विपमेंट (ओएचई) मार्गावर दहिसर ते कामराज नगरपर्यंत सेक्शनचे निरीक्षण पूर्ण केले आहे.

कोरोनाचा फटका

पश्चिम उपनगरातील वाहतूककोंडी फोडत मुंबईकरांना मेट्रोसारखी अत्याधुनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एमएमआरडीएने या दोन मेट्रो मार्गाचे काम हाती घेतले. त्यानुसार हे दोन्ही मेट्रो मार्ग डिसेंबर २०२० मध्ये सुरू होणार होते. मात्र मार्च २०२० मध्ये राज्यात-देशात कोरोनाचा कहर सुरू झाला. त्यानंतर लॉकडाऊन सुरू झाले. या प्रकल्पावर काम करणारे मजूर भीतीने आपापल्या गावी गेले. परिणामी काम मंदावले. डेडलाइन चुकली. पण दिवाळीनंतर कामाने वेग घेतला. त्यानुसार एमएमआरडीएने मे २०२१ ची नवीन डेडलाइन दिली. पण ही डेडलाइनही आता चुकली आहे. याला कारण ही कोरोना आणि लॉकडाऊन ठरले आहे. पण आता मात्र डिसेंबर अखेरपर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण करत हे दोन्ही मार्ग वाहतूक सेवेत दाखल करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. त्यानुसार आता ट्रायल रन घेण्यात येणार असून यासाठी ३१ मेचा मुहूर्त ठरवण्यात आल्याचे समजते आहे.

तांत्रिक तयारी

एमएमआरडीएसोबत महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशनने देखील ट्रायल रनची तयारी केली आहे. मेट्रो संचालनाची जबाबदारी एमएमओसीएलची राहणार आहे. त्यासाठी ऑपरेटर्सला प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रथम टप्प्यात ट्रायल रनसाठी ट्रेन ऑपरेटर पूर्णपणे तयार आहे. एमएमएमओसीएलनुसार ट्रेन ऑपरेटर्स, लाईन सुपरवायझर आणि एमएस यांना संचालनासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एमएमएमओसीएलने भारत अर्थ मूव्हर्स लि. कंपनी आणि दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेन ऑपरेटर्सला प्रशिक्षण दिले आहे.

चारकोप डेपोमध्ये मेट्रो तयार

बीईएमएलने पहिल्यांदा मेक इन इंडिया अंतर्गत चालकरहित स्वदेशी मेट्रो रेक विकसित केले आहे. ट्रायल रनसाठी पहिली चालकरहित मेट्रो चारकोप डेपोमध्ये तयार आहे. याचीही चाचणी चारकोप डेपोमध्ये झाली आहे. एमएमआरडीए आयुक्त आर. ए. राजीव यांच्या मार्गदर्शनाखाली मेट्रो २ ए आणि ७ च्या २० कि.मी. पर्यंत ओएचई ट्रायल रन यशस्वी झाल्याचे पाहता आता ट्रायल रन सुरू करण्याची तयारी करण्यात आली आहे. या मार्गावरील पुढील काम सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात ट्रायल रन होणार आहे.

मुंबईत दुधात भेसळ

वर्सोवा परिसरात टोळी जेरबंद

मुंबई, (वा.) दूधात भेसळ करणाऱ्या टोळीला मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रान्च युनिट १० ने अंधेरीतील वर्सोवा परिसरातून अटक केली आहे. टोळीतील दोघांना अटक करण्यात आली आहे. नामांकित कंपनी गोकूळ आणि अमूलच्या पॅकेटमधील दूध काढून त्यात भेसळ करायचे आणि हे दूध हॉटेल्स, रेस्टॉरंट आणि चहा बनवणाऱ्या दुकानांवर पुरवठा करायचे. आरोपींकडून सुमारे २९४ लीटर भेसळयुक्त दूध जप्त केले आहे.

क्राईम ब्रान्च युनिट १० च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण लोंडे यांनी सांगितले की, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनराज चौधरी यांना मिळालेल्या माहितीनुसार, अंधेरीतील वर्सोवा परिसरात दूधात भेसळ होत असून विक्रीचा गोरख धंदा सुरू आहे. ही माहिती मिळताच पोलीस उपायुक्त अकबर पठाण आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सिद्धार्थ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एका पथकाने वर्सोवातील चार बंगला येथील भारत नगर को. ऑ. हाऊ. सोसायटीतील रूम नंबर ४९ वर धाड मारली. येथे दोन जण नामांकित दूध कंपन्यांच्या पिशव्यांमधून दूध काढून त्यात पाणी भरून भेसळ करत असल्याचे आढळले. त्यानुसार या दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

"ही टोळी नामांकित कंपन्यांच्या दूधाच्या पिशव्यांतून दूध काढून त्यामध्ये काही प्रमाणात पाणी मिसळत होते. लायटर किंवा मेनबत्ती आणि स्टोव्हच्या पिनच्या माध्यमातून पुन्हा पिशवी सील बंद करत होते. त्यामुळे पिशव्यांमध्ये विशेष फरक दिसून यायचा नाही. हा प्रकार कित्येक दिवसांपासून सुरू होता.

– **अकबर पठाण**, उपायुक्त, पोलीस

७.३८ लाख मुंबईकरांनी घेतला लसीचा दुसरा डोस

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईमध्ये गेले वर्षभर कोरोनाचा प्रसार आहे. हा प्रसार कमी करण्यासाठी लसीकरण केले जात आहे. या लसीकरणादरम्यान गेल्या चार महिन्यांत मुंबईमध्ये ३० लाख लसीचे डोस देण्यात आले आहेत. मात्र त्यापैकी ७ लाख ३८ हजार ७१३ नागरिकांनाच लसीचा दुसरा डोस देण्यात आले आहे. यामुळे सुमारे १ कोटी ३० लाख मुंबईकर नागरिकांपैकी फक्त ७ लाख ३८ हजार जणांनाच कोरोनापासून सुरक्षित करण्यात मुंबई महापालिकेला यश आले आहे.

३०.१४ लाख लाभार्थ्यांचे आतापर्यंत लसीकरण

२२.७६ लाख लाभार्थ्यांना पहिला डोस

९९,२०६ तरुणांना २०६ लसीचे आतापर्यंत देण्यात आले डोस

कोरोनाची लागण होण्याचा धोका कमी

मुंबईत १६ जानेवारीपासून कोरोना लसीकरण मोहीम सुरु आहे. या मोहिमेदरम्यान केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या कोव्हिशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या दोन लसी नागरिकांना दिल्या जात आहेत. प्रत्येक नागरिकांना लसीचे दोन डोस दिले जात आहेत. लसीचे दोन डोस दिल्यावर नागरिकांना कोरोनाची लागण होण्याचा धोका कमी असल्याचे सांगण्यात आले आहे. यानुसार मुंबईमध्ये आतापर्यंत एकूण ३० लाख १४ हजार ७४३ लाभार्थ्यांना लस देण्यात आली आहे. त्यापैकी २२ लाख ७६ हजार ३० लाभार्थ्यांना पहिला, तर ७ लाख ३८ हजार ७१३ लाभार्थ्यांना दुसरा डोस देण्यात आला आहे. याचाच अर्थ मुंबईमधील १ कोटी ३० लाख नागरिकांपैकी फक्त ७ लाख ३८ हजार ७१३ जणांनाच कोरोनापासून सुरक्षीत करण्यात महापालिकेला यश आले आहे.

३ लाख आरोग्य कर्मचाऱ्यांना लस

मुंबईत आतापर्यंत एकूण ३० लाख १४ हजार ७४३ लाभार्थ्यांना लस देण्यात आली, त्यात २२ लाख ७६ हजार ३० लाभार्थ्यांना पहिला, तर ७ लाख ३८ हजार ७१३ लाभार्थ्यांना दुसरा डोस देण्यात आला आहे. आतापर्यंत आरोग्य कर्मचाऱ्यांना ३ लाख १ हजार ३४७, फ्रंटलाईन वर्कर ३ लाख ५९ हजार १५०, ज्येष्ठ नागरिक ११ लाख ८९ हजार ९९९, ४५ ते ५९ वर्षांमधील नागरिकांना १० लाख ६५ हजार ४१ तर १८ ते ४४ वर्षांमधील नागरिकांना ९९ हजार २०६ लसीचे डोस देण्यात आले आहेत.

लसीचा तुटवडा, ग्लोबल टेंडर

मुंबईत १६ जानेवारीपासून लसीकरण सुरु आहे. या लसीकरणादरम्यान पालिकेने लसीचा पुरवठा किती होणार याकडे लक्ष न देता, हवी तशी खासगी लसीकरण केंद्रांना मंजुरी दिली. तसेच महापालिकेने देखील लसीकरण केंद्रे सुरू केली. याचा परिणाम म्हणून नागरिकांनी लसीकरणाला प्रचंड प्रतिसाद दिला. दिवसाला ४० ते ५० हजार लाभार्थ्यांना लस दिली जात होती. मात्र मागणी एवढे लसीचे उत्पादन होत नसल्याने, लसीचा तुटवडा जाणवू लागला. लसीचा तुटवडा असल्यामुळे अनेक लसीकरण केंद्रे बंद ठेवण्याची वेळ महापालिकेवर आली. लसीचा तुटवडा जाणवत असल्याने पालिकेने १ कोटी लसीसाठी ग्लोबल टेंडर मागवले आहे. त्याला दोन वेळा मुदतवाढ दिली असून, ८ पुरवठादारांनी प्रतिसाद दिला आहे.

तिघांना अटक; महिला आरोपी फरार

'सेक्सटॉर्शन' रॅकेटचा पर्दाफाश

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मोठ्मोठ्या व्यावसायिकांना हनी ट्रॅपचे आमिष दाखवून ब्लॅकमेल करणाऱ्या 'सेक्सटॉर्शन' रॅकेटचा घाटकोपर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी याप्रकरणी तिघांना अटक केली आहे. तसेच टोळीतील मुख्य आरोपी महिला फरार आहे. हे आरोपी व्यावसायिकांना ब्लॅकमेल करून त्यांच्याकडून बक्कल पैसा जमा करत होते. पोलिसांनी आरोपींकडून एक कार जप्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या गँगमध्ये चार जणांचा समावेश आहे. अरबाज खान (३०), रणजित मोरे (२९), साहिल राजू नाडर (२१) आणि शबनम दिवेकर

(२५) अशी आरोपींची नावे आहेत. ही टोळी आधी बड्या आणि पैसे असणाऱ्या व्यावसायिकांचा शोध घ्यायची आणि टोळीतील शबनम सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्या संपर्कात यायची. सुरूवातीला चॅट आणि नंतर व्हीडिओ कॉलच्या माध्यमातून चर्चा केल्यानंतर लॉजमध्ये भेटण्याचे नियोजन व्हायचे. टोळीतील इतर सदस्य महिलेचा भाऊ, पती आणि नातेवाईक असल्याचे भासवत व्यावसायिकाला मारहाण करायचे आणि नंतर बलात्कार करण्याचा गुन्हा दाखल करू, घरी सांगू, अशी धमकी देऊन ब्लॅकमेल करायचे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

घाटकोपर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र आगरकर यांनी सांगितले की, अशाच प्रकारे या टोळीने घाटकोपरमध्ये राहणाऱ्या एका व्यावसायिकाला आपला शिकार बनवले होते. जेव्हा तो महिलेसोबत लॉजमधून बाहेर आला आणि जबरदस्ती कारमध्ये बसवून त्याला कल्याणला नेण्यात आले. हे प्रकरण मिटवण्यासाठी १ लाखाची मागणी केली होती. पीडितच्या तक्रारीनुसार आरोपींना अटक करण्यात आली.

म्हाडा कॉलनीत माकडांचा धुमाकूळ

वणवा, अमाप वृक्षतोडीमुळे वन्यप्राणी शहरी वस्तीकडे

मुंबई, (वा.) न्यू दिंडोशी येथील म्हाडा कॉलनी ही आरे जंगलाच्या अगदी लागून असलेली वसाहत आहे. हल्ली जंगलात लागणाऱ्या आगी आणि अमाप वृक्षतोड यामुळे जंगलातील माकडांचा वावर जंगल सोडून म्हाडा वसाहतीत जास्त वाढला आहे. तसेच म्हाडा वसाहतीमधील बऱ्याच इमारतींचे रंगकाम किंवा डागडुजीचे काम चालू असल्यामुळे बांबूच्या परांची या माकडांसाठी पर्वणीच ठरल्या आहेत.

या माकडाचा होणार त्रास लक्षात घेऊन समर्थ फेडरेशन (न्यू म्हाडा) यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. सध्याच्या करोनाच्या काळात सगळ्याच सरकारी यंत्रणा व्यस्त असताना सुद्धा वन विभागाने तातडीने दखल घेऊन त्वरीत कारवाई केली. विभागामध्ये पिंजरे लावून काही माकडांना पकडण्यात त्यांना यश आले. मंगळवारी रात्री उशिरा वनविभागाची गाडी येऊन पकडण्यात आलेल्या माकडांना त्यांनी ताब्यात घेतले.

अल्मेडा पार्कचा होणार विकास

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतील मैदाने आणि अन्य भागांचा विकास करून मुंबईकरांना दिलासा देण्याचे काम महापालिकेने हाती घेतले असून त्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. वांद्रे वेस्ट येथील प्रोफेसर अल्मेडा पार्कचा विकास कण्याचे काम पालिका हाती घेणार असून त्यासाठी जवळ जवळ साडे तीन कोटींचा खर्च करण्यात येणार आहे.शुक्रवारी होणाऱ्या स्थायी समितीत हा प्रस्ताव मंजुरीसाठी आला आहे.

पालिका करणार साडेतीन कोटी खर्च

वांद्रे पश्चिम येथील महानगरपालिकेच्या प्रोफेसर अल्मेडा पार्कचा विकास करण्यात येणार आहे. पद पथ बांधणे, लोखंडी जाळी सह संरक्षक भिंत बांधणे, सुरक्षा रक्षक चौकी, त्याच बरोबर सुशोभित कमान, लहान मुलांचे खेळाचे साहित्य, व हिरवळीची कामे इत्यादी कामांचा यात समावेश आहे.

भूमीपूजन

सिद्धार्थ कॉलनी विकास संवा संघ हाऊसिंग फेडरेशनच्या वतीने इमारत उभी केली जात असून या इमारतीच्या 'सॅम्पल फ्लॅट'चे भूमीपूजन तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त भिक्खुंच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फेडरेशनचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. कोरोना नियमांचे पालन करून हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

मुंबईत १,३६२ नवे कोरोनाबाधित

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईत नेहमी बाधितांपेक्षा कोरोनामुक्तांची संख्या अधिक आहे. मुंबईत कोरोनाचा आकडेवारीत चढ उतार होत आहे. आजही मुंबईची संख्या वाढलेली पहायला मिळत आहे. बुधवारी मुंबईत कोरोनामुक्त होणाऱ्यांच्या तुलनेत बाधितांची संख्याच जास्त आहे. मुंबईत बुधवारी १ हजार ३६२ नव्या कोरोनाबाधित रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. मुंबईत आतापर्यंत नोंद करण्यात आलेल्या रुग्णांची संख्या ७ लाख १ हजार २६६ वर गेली आहे. मुंबईचा रिकव्हरी रेट ९४ टक्के इतका नोंदवण्यात आला. मुंबईत बुधवारी १ हजार २१ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. हीच संख्या मंगळवारी १ हजार ४२७ इतकी होती.

PUNE MUNICIPAL CORPORATION
Office of the Superintending Engineer Drainage (Projects)
Pune Municipal Corporation, 1st Floor, PMC Main Building, Shivaji Nagar, Pune 411005

जाहिरात क्र. ३/१३३ दि. ....

Corrigendum for 4th Extension of Bid Submission

Corrigendum is being given to the works of this department mentioned below under Pune Municipal Corporation. All the details regarding the tender terms, conditions etc. of this work are mentioned in the tender set and the tender set is available to view free of cost on www.mahatenders.gov.in.

Sr. No.	Work Name	Revised Dates
1	Work Name : Providing and Laying Sewer Network and Construction of Sewage Treatment Plants and Operation & Maintenance of Sewage Treatment Plants for 5 years in Newly Merged 11 Villages in Pune Municipal Corporation. Tender No. : PMC/DRAINAGE/2020/210	Registered bidders can avail the e-tender document : 11/02/2021 to 03/06/2021 at 1500 Hrs. The last date of submission of bid : 03/06/2021 at 1530 Hrs. by way of e-tendering system. Opening of bid : 04/06/2021 at 1600 Hrs.

The sale and acceptance of the above tender is online through the website www.mahatenders.gov.in. All other content remains unchanged as previously published.

Sd/-
Superintending Engineer,
Drainage (Projects),
Pune Municipal Corporation

युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India
(भारत सरकारचा उपक्रम) A Government of India Undertaking
आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

स्ट्रेस्ड् ॲसेट मॅनेजमेंट ब्रँच : १०४, तळमजला, भारत हाऊस, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३. **दूर. क्र.** : (०२२) – २२६१ ५२०१, २२६१ ५२०२, २२६१ ५२०५. **ई–मेल** : samvmumbai@unionbankofindia.com

स्थावर संपत्तीच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सीक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतूदीसह सदर अंतर्गत जंगम प्रतिभूत संपत्तीच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते आहे तसेच विशेषत: कर्जदार व हमीदार यांना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित खालील विवरणीत जंगम प्रतिभूत संपत्ती जिचा युनियन बँक ऑफ इंडियाच्या (प्रतिभूत धनको) प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे विधायक/**प्रत्यक्ष ताबा** घेण्यात आला आहे त्या मालमत्तेची विक्री युनियन बँक ऑफ इंडियाच्या थकबाकीच्या खालील निर्देशित संबंधित कर्जदार व हमीदारांकडून वसुलीसाठी खालील निर्देशित रकमेच्या वसुलीकरिता ही **जशी आहे जेथे आहे जशी आहे जी आहे** व **जी काही आहे तेथे आहे** तत्त्वावर व कोणत्याही अडथळ्याविना **दि. ३०.०६.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. १.००** रोजी खालील निर्देशित वेळेत विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य व इसारा रक्कमसुद्धा खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे :

कर्जदार, सहकर्जदार व हमीदाराचे नाव व पत्ता :	थकित रक्कम : रु.
१) **आसुती ट्रेडिंग प्रा. लि.** (कर्जदार), १४१८, दलामल टॉवर बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१. २) **श्री. सिद्धार्थ मदनलाल बगरेचा** (संचालक/हमीदार) सुयोग रेसिडेन्सी, फ्लॅट क्र. ५०२, ॲव्हेंटिस्ट हॉस्पिटलजवळ, सॅसलबरी पार्क, गुलटेकडी, पुणे – ४११ ०३७. ३) **श्री. राज कुमार गोईल** (संचालक/हमीदार) जीएच–१४/२८३, पश्चिम विहार, नवी दिल्ली – ११० ०८७.	**४७,६१,५८,०८९.९८** (रु. सत्तेचाळीस एकसष्ट लाख अठ्ठावन्न हजार एकोणनव्वद व अठ्याण्णव पैसे मात्र)

मालमत्ता :– स्थावर मालमत्ता अर्थात फ्लॅट क्र. २०२, २ रा मजला, सी विंग, इमारत **नमो शिवास्तू सिटी,** बिल्डिंग क्र. ३, **मोजमापित** क्षेत्र **६४६.०४** चौ. फूट, प्लॉट धारक सर्व्हे क्र. १०६, हिस्सा क्र. १,२,३,४ व स्वर्हे क्र. ११०, मु. विवोर स्थित, पालघर नगर परिषदेच्या अधिकारक्षेत्रात व नोंदणीकृत जिल्हा पालघर व त्याच्या सीमापुढीलप्रमाणे :– ■ **उत्तर व त्यादिशेस** : नमो शिवास्तू सिटी, इमारत क्र. ३डी, ■ **दक्षिण व त्यादिशेस** : अंतर्गत रस्ता/ मोकळा प्लॉट, ■ **पूर्व व त्यादिशेस** : बांधकामाधिन इमारत, ■ **पश्चिम व त्यादिशेस** : नमो शिवास्तू सिटी, इमारत क्र. ३बी.
■ **ई – लिलाव दिनांक व वेळ** : दि. ३०.०६.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. १.००, ■ **राखीव मूल्य** : रु. २९,०७,०००/–, ■ **जमा करावयाची इसारा रक्कम** : रु. २,९०,७००/–, ■ **मागणी सूचना दिनांक** : २७.०९.२०१७, ■ **ताबा सूचना दिनांक** : ३१.०७.२०१८ (प्रत्यक्ष ताब्याअंतर्गत)

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता दिलेली लिंक अर्थात www.unionbankofindia.co.in वा https://www.ibapi.in वा www.mstcecommerce.com येथे भेट द्या.

मालमत्तेचे परिक्षणाची तारीख दि. १९.०६.२०२१

नोंदणीकरण व लॉग इन तसेच बोली नियमांकरिता भेट द्या : **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/indes.jsp.**

दिनांक : २८.०५.२०२१
ठिकाण : मुंबई

सही/–
प्राधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया

फॉर्म-जी

स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण

(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्ट्सी (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता परिसमापन ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ (ए) अंतर्गत)

माननीय एनसीएलटीच्या १६ एप्रिल, २०२१ दिनांकित आदेश, २३ एप्रिल, २०२१ रोजी आरपीद्वारे करण्यात आलेली सार्वजनिक उद्घोषणा आणि कॉर्पोरेट कर्जदारांच्या धनकोंच्या समितीच्या निर्णयाच्या अनुरोधाने याद्वारे कॉर्पोरेट कर्जदार अर्थात अदित्य **आदित्य विद्युत अप्लायन्सेस लिमिटेड** (एव्हीएएल) आणि **आदित्य फॅब्रिकेशन्स प्रायवेट लिमिटेड** (एएफपीएल) (एकत्रिकृत कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रियान्वित) करिता विभेदन योजना सादर करण्यासाठी स्वारस्यांची अभिव्यक्ती आमंत्रित करण्यात येत आहे.

संबंधित विवरण

१	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	१. आदित्य विद्युत अप्लायन्सेस लिमिटेड २. आदित्य फॅब्रिकेशन्स प्रायवेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट ऋणकोचा संस्थापन दिनांक	१. २६ जून, १९८९ २. २४ नोव्हेंबर, २००३
३	कॉर्पोरेट ऋणको यांच्याशी संबंधित / नोंदणीकृत असलेले प्राधिकारी	कंपन्या निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर / लिमिटेड लाइबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर	१. U31200MH1989PLC052364 २. U51505MH2003PTC143265
५	कॉर्पोरेट ऋणको यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व मुख्य कार्यालय (काही असल्यास)	सर्व्हे क्र. १६८, हिस्सा क्र. १०, सोनाळे गांव, भिवंडी बायपास रोड, ठाणे-४२१ ३०२, महाराष्ट्र, भारत.
६	कॉर्पोरेट ऋणकोची दिवाळखोरी प्रारंभ दिनांक	१. एव्हीएएल : ११ सप्टेंबर, २०१९ २. एएफपीएल : १५ मे, २०२० ३. एकत्रित : १६ एप्रिल, २०२१
७	स्वारस्य अभिव्यक्तीसाठीचे आमंत्रण दिनांक	२८ मे २०२१
८	संहितेच्या अनुच्छेद २५(२)(एच) अंतर्गत ठराव अर्जकरिता पात्रता उपलब्धता	तपशील आयबीबीआयचे संकेतस्थळ www.adityavidyut.com येथे उपलब्ध आहे किंवा adityagroupcirp@gmail.com येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
९	अनच्छेद २९ ए अंतर्गत लागू अपात्रतेचे निकष	तपशील आयबीबीआयचे संकेतस्थळ **www.adityavidyut.com** येथे उपलब्ध आहे किंवा **adityagroupcirp@gmail.com** येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
१०	स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या स्वीकृतीची अंतिम तारीख	१२ जून २०२१
११	संभाव्य ठराव अर्जांची तात्पुरती सूची जारी होण्याची तारीख	२२ जून २०२१
१२	तात्पुरत्या सूचीकरिता हरकत सादर करण्याची अंतिम तारीख	२७ जून २०२१
१३	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम सूची जारी होण्याची तारीख	०७ जुलै २०२१
१४	संभाव्य ठराव अर्जदारांसाठी माहितीचे ज्ञापन, मूल्यांकन निकष तसेच ठराव आराखड्याची विनंती सादर करण्याची तारीख	२७ जून २०२१
१५	ठराव आराखडा, मूल्यांकन निकष, माहिती ज्ञापन व पुढील माहिती प्राप्त करण्याची विनंतीचे स्वरुप	तपशील **adityagroupcirp@gmail.com** येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
१६	ठराव आराखडा सादर करण्याची अंतिम तारीख	२७ जुलै २०२१
१७	ठराव अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याचे स्वरूप	ई-मेल आयडीवर इलेक्ट्रॉनिक प्रारुपात किंवा वरील अनुक्रमांक २० किंवा २१ मध्ये वितरित पत्त्यावर स्पीड पोस्ट, रजिस्टर्ड पोस्ट वा हातबटवड्याद्वारे.
१८	मंजुरीकरिता निर्णय अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याची अंदाजित दिनांक	२८ सप्टेंबर २०२१
१९	ठराव अधिकाऱ्यांचे नाव नोंदणीकरण क्रमांक	**श्री. क्षितिज गुप्ता** आयपी नोंदणीकरण क्र. **IBBI-IPA-002/IP-N00721/2018-19/12140**
२०	बोर्डकडे नोंदणीकरण केल्यानुसार ठराव अधिकाऱ्याचे नाव, पत्ता व ई-मेल	**नाव : क्षितिज गुप्ता, पत्ता :** फ्लॅट क्र. सी/१०४, लोटस् को-ऑप. हौ. सोसायटी, गुंदेचा व्हॅली ऑफ फ्लॉवर, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई उपनगर, मुंबई-४०० १०१, महाराष्ट्र, भारत.
२१	ठराव अधिकाऱ्याकडे पत्रव्यवहार करावयाचा पत्ता व ई-मेल	**पत्ता :** बी-२०२, शॅराटॉन क्लासिक, चरत सिंग कॉलनी, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०६९. **ई-मेल : kshitiz.ca@gmail.com adityagroupcirp@gmail.com**
२२	पुढील तपशील उपलब्ध असण्याचे वा प्राप्त करण्याचे ठिकाण	तपशील **adityagroupcirp@gmail.com** येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
२३	फॉर्म जी प्रसिद्धी दिनांक	२८ मे २०२१

टीपा :
१. यामध्ये प्रसिद्ध फॉर्म जी हा उपरोक्त कॉर्पोरेट कर्जदारांसाठी अगोदर प्रसिद्ध करण्यात आलेल्या फॉर्म जी चा पुढील भाग आहे आणि विद्यमान प्रस्तावित विभेदन अर्जदाराना अगोदर सादर केलेल्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीसोबत राहण्याचा किंवा या फॉर्म जीच्या अटीमध्ये नवीन स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याचा पर्याय असेल. या संदर्भात विद्यमान प्रस्तावित विभेदन अर्जदारांकडून विशिष्ट संवाद आवश्यक आहे.
२. ठराव आराखड्यातील अटी व शर्ती, बोली सादरीकरण प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर बदलली / सुधारित / तहकूब / रद्द / विस्तारित / परिवर्तित केली जाऊ शकेल.
३. आरपी हे धनको समितींद्वारे निर्देशांच्या अंतर्गत कोणतेही कारण न देता वा कोणतीही सूचना न देता वा दायित्वाविना प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रस्तावित बोलीदारास स्वीकारणे वा रद्द करणे वा अपात्र करण्याचा अधिकार राखून आहेत.

सीए क्षितिज गुप्ता, ठराव अधिकारी
आदित्य विद्युत अप्लायन्सेस लिमिटेड आणि आदित्य फॅब्रिकेशन्स प्रायवेट लिमिटेड करिता
पत्ता : फ्लॅट क्र. सी/१०४, लोटस् को-ऑप. हौ. सोसायटी, गुंदेचा व्हॅली ऑफ फ्लॉवर, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई उपनगर, मुंबई-४०० १०१, महाराष्ट्र, भारत.
दिनांक : २८ मे, २०२१
ठिकाण : मुंबई
ई-मेल : **kshitiz.ca@gmail.com, adityagroupcirp@gmail.com**

(टीप : सदरचा "फॉर्म जी" हा मूळ इंग्रजी "फॉर्म जी"चा स्वैर अनुवाद असून तफावत आढळल्यास इंग्रजी "फॉर्म जी"चा मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.)